RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक ३६(३)] गुरुवार, ऑक्टोबर ३०, २०२५/कार्तिक ८, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ६९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

विभागीय आयुक्त कार्यालय
नाशिक विभाग, नाशिक
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,आय.एस.पी.समोर, नाशिक ४२२१०१

दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५

आदेश

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम.

क्रमांक विआशा/पंरा/ग्रामपंचायत विघटन प्रकरण क्र.०३/२०२५.—ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा III) चे कलम १४५ (१-अ) मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, जळगाव यांनी पत्र दिनांक ७ जून, २०२५ अन्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडेस प्रस्ताव सादर केला असुन, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडील दिनांक ७ एप्रिल,२०२५ रोजीचे अहवालान्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४५ (१-अ) मध्ये नमूद केलेनुसार, "पंचायतीतील एकूण संख्येच्या निम्म्याहून अधिक जागा रिक्त झाल्या असतील तर, राज्य शासनास, **राजपत्रातील** आदेशाद्वारे, अशी पंचायत विघटित करता येईल", यानुसार ग्रामपंचायत कलाली, ता.अमळनेर, जि.जळगाव या पंचायतीतील एकूण संख्येच्या निम्म्याहून अधिक जागा रिक्त झाल्या असल्याने उक्त तरतुदीनुसार सदर पंचायत विघटित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी जळगाव यांनी विभागीय आयुक्त,नाशिक यांचेकडेस सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४५ (१-अ) मध्ये "पंचायतीतील एकुण संख्येच्या निम्म्याहून अधिक जागा रिकाम्या झाल्या असतील तर, राज्य शासनास **राजपत्रातील** आदेशाद्वारे अशी पंचायत विघटित करता येईल" याप्रमाणे तरतूद असून, त्यानुसार सदर पंचायत विघटित करण्याबाबत पुढील कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाचे ग्रामविकास विभागाकडील अधिसूचना क्र.व्हीपीए १०८३/सीआर-१६७०/२१, दिनांक १ जून, १९८३ व शासन परिपत्रक क्र.ग्रापनि १०९६/प्र.क्र.७३/२१-अ, दिनांक १२ जुलै १९९६ नुसार राज्य शासनाचे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४५ (१-अ) नुसार ग्रामपंचायत विघटित करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, जर ग्रामपंचायत विघटित झाली तर, त्यामुळे ज्यांचे सदस्यत्व पदाचा कालावधी संपुष्टात येईल अशा सदस्यांचे म्हणणे ऐकून घेणे योग्य असल्यामुळे या प्रकरणी विभागीय आयुक्त, नाशिक यांचेसमोर दिनांक ९ सप्टेंबर, २०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली असून संबंधित सदस्यांचे स्पष्टीकरण विचारात घेतल्यानंतर विभागीय आयुक्त,नाशिक यांचे असे मत आहे की, या संपुर्ण प्रकरणामध्ये राजीनामा न दिलेल्या सदस्यांचा कोणताही दोष दिसून येत नाही. साधारण परिस्थितीमध्ये त्यांचा दोष नसल्यामुळे त्यांना निवडणुकीद्वारे विहित मार्गाने प्राप्त झालेले ग्रामपंचायत सदस्यांचे अधिकार आणि कर्तव्यांपासून वंचित ठेवणे योग्य होणार नाही. तथापि, आणि साधारण परिस्थितीमध्ये अशा ग्रामपंचायतीच्या बाबतीत रिक्त जागांसाठी पोटनिवडणुका घेणे उचित राहील. तथापि,ग्रामपंचायत कलालीची मुदत ही दि.०९/०२/२०२६ रोजी संपत आहे. म्हणजेच सुनावणी संपल्याच्या तारखेपासून ही मुदत १५३ दिवसात म्हणजेच सहा महिन्यांच्या आतील आहे. त्यामुळे इतक्या कमी कालावधीसाठी पुन्हा निवडणुका घेऊन उर्वरित ०६ सदस्यांना साधारणतः ५ महिन्यांसाठी निवडून देणे योग्य राहील का? हा पुढील प्रश्न निर्माण होतो. याबाबत कोणत्याही कालमर्यादेबाबत निश्चित असे आदेश अथवा न्यायनिवाडे निदर्शनास आलेले नाही. तथापि, राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्र.रानिआ/ग्रापंनि २०२४/प्र.क्र.४/का.८ दिनांक ५ मार्च, २०२५ मध्ये ग्रामपंचायत सदस्यांच्या रिक्त जागा भरण्याबाबत माहिती मागवत असतांना सहा महिने पेक्षा अधिक कालावधी शिल्लक असलेल्या ग्रामपंचायतीबाबत माहिती मागितल्याचे दिसून येते. सदर आदेशाचा आधार घेतला असता असे सामान्यतः ठरवता येणे शक्य आहे की, सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी शिल्लक असल्यास पोट निवडणुकीद्वारे रिक्त जागा भरणे प्रशासकीय, वित्तीय आणि इतर बाबींचा विचार करता योग्य राहील. या प्रकरणात सुनावणीच्या अंतिम तारखेपासून शिल्लक कालावधी हा ५ महिने इतका आहे. पोट निवडणूक घेण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी जाईल असे गृहीत धरल्यास संबंधित सदस्यांना उर्वरित कालावधी ३ महिन्यांचा मिळेल. प्रशासकीय, वित्तीय आणि इतर बाबींचा विचार करता सदर बाब योग्य वाटत नाही. Sou. Jamuna Mahadeo Dalvi and Others Vs The State of Maharashtra and others प्रकरणात उद्भवलेली परिस्थिती या प्रकरणासारखीच असून त्यावेळी मा.न्यायमूर्तींनी ग्रामपंचायत विघटित करण्याची कृती योग्य ठरवली होती. त्यामुळे ग्रामपंचायत विघटित करून नवीन निवडणुका पुन्हा घेणे आणि तोपर्यंत प्रशासक नेमणे हा पर्याय या ठिकाणी वापरणे योग्य राहील असे विभागीय आयुक्त यांचे मत आहे.

म्हणून, त्याअर्थी, वर नमूद अधिकारांचा वापर करून, विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत :—

१. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १४५ (१-अ) आणि शासनाचे ग्रामविकास विभागाकडील अधिसूचना क्र.व्हीपीए १०८३/सीआर-१६७०/२१, दिनांक १ जून, १९८३ व शासन परिपत्रक क्र.ग्रापनि १०९६/प्र.क्र.७३/२१-अ, दिनांक १२ जुलै १९९६ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, विभागीय आयुक्त,नाशिक याद्वारे, कलाली, तालुका अमळनेर जिल्हा जळगाव येथील ग्रामपंचायत, हा आदेश **शासन राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून विघटित करीत आहे.

२. उक्त पंचायतीच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्ये पार पाडण्यासाठी जळगाव जिल्ह्यातील संबंधित पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी करावी.

३. सदरच्या विघटित केलेल्या ग्रामपंचायतची पुन्हा निवडणूक लावण्यासाठी जिल्हाधिकारी, जळगाव यांनी मा.राज्य निवडणूक आयोग यांचेकडेस त्वरीत विनंती करावी.

४. सदर आदेश सर्व संबंधितांना कळविण्यात यावा.

५. खर्चाबाबत आदेश नाही.

डॉ. प्रवीण गेडाम,
विभागीय आयुक्त,नाशिक.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.